# आरती श्रीपाद श्रीवल्लभांची

आरती दत्तावताराची
श्रीपाद श्रीवल्लभांची ॥धृ.॥

झाले कित्येक अवतार
देवदेवींचे काळानुसार
श्रीपादमहीमा परी अपार
संपणार अवतार ना कधी
आरती दत्तावताराची
श्रीपाद श्रीवल्लभांची ॥१॥

जी जी घडे जगी गोष्ट
असे त्यांचाच संकल्प
तपोबळे जाळीती पाप
नियम सृष्टीचे पाळूनी
आरती दत्तावताराची
श्रीपाद श्रीवल्लभांची ॥२॥

श्रीपाद नसती अवतार
असती ब्रह्माचाच आकार
म्हणूनी ते अजन्मा अमर
वाहती विश्वाची काळजी
आरती दत्तावताराची
श्रीपाद श्रीवल्लभांची ॥३॥

- नारायण
०२/२६/१८